मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 31 मार्च 2024 | पान- 1

# ऑनलाइन कर भरण्यास शहरवासीयांची पसंती

## 513 कोटी 58 लाख ऑनलाइन कर जमा : आत्तापर्यंत910 कोटी रूपयांचा कर जमा

**पिंपरी | प्रतिनिधी**

ऑनलाइनचा जमाना दिवसेंदिवस वाढत असतानाच पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिक हायटेक होताना दिसून येत आहे. 3 लाख 29 हजार 237 शहरवासीयांनी 513 कोटी 58 लाख रूपयांचा ऑनलाइन कर भरला आहे. तर विविध अँपच्या माध्यमातून 9 हजार 109 नागरिकांनी 9 कोटी 49 लाख रूपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठी 17 विभागीय कार्यालये आणि ऑनलाइनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत 4 लाख 92 हजार 428 मालमत्ता धारकांनी 910 कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे.

यापैकी तब्बल 3 लाख 29 हजार 237 शहरवासीयांनी 513 कोटी 58 लाख रूपयांचा ऑनलाइन कर भरला आहे. 91 हजार 411 मालमत्ता धारकांनी 131 कोटी 24 लाखांचा रोखीने भरणा केला आहे. 29 हजार 48 जणांनी धनादेशाद्वारे 147 कोटी 17 लाख, 653 जणांनी आरटीजीएसव्दारे 43 कोटी 20 लाख, 648 जणांनी डीडीच्या माध्यमातून 8 कोटी 12 लाख, 9 हजार 109 जणांनी विविध अॅपच्या माध्यमातून 6 कोटी 93 लाख, 1 हजार 180 जणांनी इनइफ्टीव्दारे 6 कोटी 83 लाखांचा कर भरणा केला आहे. शहरातील 17 झोनपैकी वाकड झोनमध्ये सर्वाधिक म्हणजे 65 हजार मालमत्ता धारकांनी 148 कोटी तर सर्वात कमी तळवडे झोनमध्ये फक्त 8 हजार 96 मालमत्ता धारकांनी 23 कोटी 38 लाखांचा कर भरणा केला आहे.



### कर संकलन कार्यालये रात्री नऊपर्यंत सुरू राहणार

कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने कर वसुलीचे 1 हजार कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. आज आणि उद्या सकाळी साडेनऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत नागरिकांना कर भरता यावा, यासाठी कॅश काऊंटर सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली. तसेच शहरातील निवासी मालमत्ता धारकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. मात्र, ज्या थकबाकीदारांची आर्थिक क्षमता नाही, त्यांनी टप्पा-टप्पाने जेवढा शक्य आहे तेवढा कर भरावा, असे आवाहनहीदेशमुख यांनी केले आहे.

---

# बारणेंनी घेतले लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन

## लक्ष्मणभाऊंच्या आठवनींना उजाळा : चिंचवड परिसरात प्रचाराला सुरुवात

**पिंपरी| प्रतिनिधी**

शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)- राष्ट्रीय समाज पक्ष महायुतीचे मावळचे अधिकृत उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (शनिवारी) पिंपळेगुरव येथील भाजपचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेतले. त्यानंतर चिंचवड परिसरात प्रचाराला सुरुवात केली आहे.

महायुतीकडून उमेदवारी जाहीर होताच खासदार बारणे यांनी लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेतले. यावेळी भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी नगरसेवक शशिकांत कदम, उद्योजक रवि नामदे उपस्थित होते. खासदार बारणे यांनी जगताप यांच्या निवासस्थानीही सदिच्छा भेट दिली. आमदार अश्विनी जगताप, शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्यासोबत संवाद साधला. लक्ष्मणभाऊंच्या आठवनींना उजाळा दिला.

भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, फिर एक बार मोदी सरकार, अबकी बार 400 पार... हे साध्य करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे काम सुरु आहे. महायुतीची अधिकृत उमेदवारी खासदार श्रीरंग बारणे यांना जाहीर झाली आहे. उमेदवार निश्चित झाल्याने भाजपने झोकून देऊन काम सुरु केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी शहर भाजपची संघटना, कार्यकर्ते कामाला लागले आहेत.



दरम्यान, महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे हे उद्या रविवारी तळेगाव दाभाडे येथे जाणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे मावळचे आमदार सुनील शेळके तसेच भाजपचे नेते, माजी राज्यमंत्री बाळा उर्फ संजय भेगडे यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे समजते.

खासदार श्रीरंग बारणे मागील दहा वर्षांपासून मावळचे प्रतिनिधित्व संसदेत करत आहेत. 2014, 2019 मध्ये ते मोठ्या मताधिक्याने मावळमधून निवडून गेले. आता तिसऱ्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने खासदार बारणे यांच्यावर विश्वास टाकला आहे. त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

# प्राण्यांची रेल्वे सुसाट!

## ब्रेकफास्ट विथ उमेदवार : पुण्यातील विविध विषयांवर गप्पा, उमेदवारांची प्रचाराला सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

रेल्वेकडून प्रवाशांसोबत प्राण्यांची वाहतूक केली जात असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. गेल्या वर्षी पुणे रेल्वे स्थानकातून सुमारे सहा हजार पाळीव प्राण्यांची वाहतूक झाली. यंदा जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात मिळून सुमारे सव्वाहजार प्राण्यांची वाहतूक झाली. यात सर्वाधिक संख्या कुत्र्यांची असून, त्याखालोखाल मांजरांची संख्या आहे.

अनेकदा प्रवासी आपल्या पाळीव प्राण्यांसोबत रेल्वेने प्रवास करतात. अशा वेळी गाडी सुटण्याच्या दोन तास आधी स्थानकावर पोहोचून त्यांना पाळीव प्राण्यांची नोंदणी करावी लागते. पाळीव प्राण्यांची वाहतूक सामानाच्या डब्यातून प्रामुख्याने केली जाते. तिथे पाळीव प्राण्यांसाठीचे पिंजरे असतात आणि त्यातून या प्राण्यांची वाहतूक होते. याशिवाय प्रवासी पाळीव प्राण्यांना सोबत घेऊनही प्रवास करू शकतात. यासाठी त्यांना वातानुकूलित प्रथम श्रेणीतील डब्यातून प्रवास करावा लागतो. यासाठी खर्च अधिक असल्याने आणि प्रवासी सामानाच्या डब्यातून आपल्या प्राण्यांची वाहतूक करण्यास पसंती देतात.

पुणे रेल्वे स्थानकातून २०२३ मध्ये एकूण 5 हजार ९२० पाळीव प्राण्यांची वाहतूक झाली. त्यात 3 हजार ४०९ कुत्रे, ६४४ मांजरे, ५१४ शेळ्या आणि 1 हजार ३५३ कोंबड्यांचा समावेश आहे. या पाळीव प्राण्यांच्या वाहतुकीतून रेल्वेला



एकूण १० लाख ९१ हजार रुपयांचा महसूल मिळाला. यंदा जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात एकूण 1 हजार २३९ पाळीव प्राण्यांची वाहतूक झाली. त्यात ७०६ कुत्रे, १०८ मांजरे, ३३६ कोंबड्या आणि ८९ शेळ्यांचा समावेश आहे. यंदा या प्राण्यांच्या वाहतुकीतून रेल्वेला 1 लाख ८३ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

### नोंदणी कशी कराल?

पाळीव प्राण्यांच्या वाहतुकीसाठी नोंदणी ऑनलाइन करता येत नाही. त्यासाठी प्रत्यक्षात रेल्वे स्थानकावर जाऊन नोंदणी करावी लागते. नोंदणी करताना प्रवाशाला त्याच्या पाळीव प्राण्याचे तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र आणि पशुवैद्यकीय डॉक्टरचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. त्यानंतर त्या प्राण्याची नोंद केली जाते. पाळीव प्राण्याच्या वाहतुकीचे शुल्क वजन, अंतर आणि गाडीचा प्रकार यावर अवलंबून असते. पुण्याहून दिल्लीला कुत्रा नेण्यासाठीचे शुल्क सुमारे ८०० रुपये आहे.

# अजित पवारांनी केलेल्या सर्वेक्षणात सुप्रिया सुळे आघाडीवर

## रोहित पवारांचा अजित पवारांना टोला : सुप्रिया सुळे अडीच लाख मतांनी निवडून येतील

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीला जवळपास दीड महिन्यांचा कालावधी राहिला असून राज्यात अद्यापपर्यंत कोणत्याही पक्षाचे जगावाटप पूर्णपणे झाले नाही. तर प्रत्येक राजकीय पक्षाकडून चर्चाच सुरू आहे. या सर्व घडामोडी दरम्यान राज्यातील सर्व जनतेचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदार संघासाठी महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर महायुतीकडून सुनेत्रा पवार यांच्या नावाची अद्यापपर्यंत घोषणा जरी झाली नसली तरी सुनेत्रा पवार यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. तर बारामती लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या हवेली तालुक्यातील भेकराईनगर भागात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत, राज्यातील अनेक घडामोडी बाबत त्यांनी भूमिका देखील मांडली.

राज्यातील अनेक भागातील महायुतीकडून उमेदवार जाहीर करण्यात आले आहे. सुनेत्रा पवार यांना बारामती लोकसभा मतदार संघामधून महायुतीकडून उमेदवारी निश्चित मानली जात आहे. मात्र अद्यापपर्यंत त्यांच्या नावाची घोषणा केली जात नाही. त्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, बारामती लोकसभा मतदार संघासाठी अजित पवार यांच्याकडून जे कोणी उमेदवार असतील. त्यांच्या बाबत अजित पवार यांच्याकडून ९ सर्व्हे करण्यात आले आहेत. त्या सर्व्हेमध्ये अजित पवार यांचे उमेदवार पिछाडीवर आहेत. तर सुप्रिया सुळे या त्यांच्या सर्व्हेमध्ये आघाडीवर आहेत. त्यामुळे आता पुन्हा एकदा म्हणजेच दहावा



सर्व्हे करतील आणि योग्य असा निर्णय घेतील, तसेच बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे या किमान अडीच लाख मताधिक्यानी निवडून येतील, असा विश्वास व्यक्त करत अजित पवारांना त्यांनी टोला लगावला.

तसेच ते पुढे म्हणाले की, मागील काही महिन्यांत भाजपने देशात आणि राज्यात पक्ष, कुटुंब फोडाफोडीची जी कार्यपद्धती अवलंबली आहे. त्यावर भाजपचे अनेक नेते मंडळी नाराज आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत मतदार मोठ्या प्रमाणावर नाराज आहे. यामुळे एकूणच परिस्थिती बघता,भाजपला त्यांचाच भाजपचा मतदार मतदान करणार नसल्याचे हे दिसून येत असल्याचे सांगत भाजप नेतृत्वावर त्यांनी निशाणा साधला.

अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांनी राजीनामा देऊन शरद पवार गटा सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, आमदार निलेश हे अजित पवार यांच्याकडे होते.त्यावेळी सातत्याने निलेश लंके यांना मतदार संघातील नागरिक भेटून सांगत होते की, जर तुम्ही साहेबांसोबत असला तर आम्ही तुम्हाला मतदान करू, त्यानंतर त्यांनी लोकसभा निवडणुक लढविण्याची इच्छा बोलावून दाखवली आणि आता निलेश लंके हे साहेबासोबत आल्याने त्यांचे मताधिक्य चांगलेच असणार आहे. बलाढ्य शक्ती विरोधात सामान्यांची शक्ती अशी लढत होणार आहे. त्यामध्ये सर्व सामान्य नागरिक निलेश लंके यांच्या पाठीशी राहतील आणि त्यांना खासदार करतील असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

# गोविंदाचे स्वागत अन् मला नाटक्या

## अमोल कोल्हेंचे शिवाजीराव आढळराव पाटलांना प्रत्युत्तर : मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवाजीराव आढळराव पाटील हे नाटक्या, नौटंकी म्हणत मला हिणवतात अशी खंत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केली. तसेच कलाकारांची कदर केल्याने मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

हिंदी सिनेसृष्टीतीला अभिनेता गोविंदा शिवसेनेत आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे स्वागत करत कलाकार हा कलाकार असतो. त्याचा अपमान करणाऱ्याला जनता धडा शिकवेल, असे म्हटले होते. गोविंदांचे स्वागत आणि छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका करुन आपला जाज्वल्य इतिहास, खरा इतिहास पोहोचवणाऱ्या माझ्या सारख्याच्या बाबतीत मुख्यमंत्री शिंदे यांचे पूर्वाश्रमीचे सहकारी आणि आती ज्यांनी पक्ष बदलला ते शिवाजीराव आढळराव पाटील हे नाटक्या, नौटंकी म्हणत हिणवतात अशी खंत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केली. तसेच कलाकारांची कदर केल्याने मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

खासदार डॉ. कोल्हे म्हणाले, की गेली काही वर्षे सातत्याने शिरूर लोकसभा मतदार संघातल्या जनतेने माझ्या सारख्या सर्वसामान्य कुटुंबातील अभिनय क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तीला लोकसभेत निवडून दिले. त्यानंतर शेलक्या शब्दांमध्ये जे कायम हिणवल जात होते. मग नाटक्या असेल, नौटंकी असेल आणि खरोखर मग प्रश्न पडतो. हिंदी सिनेसृष्टीतला सिनेस्टार आला तर मग त्यांचे स्वागत आणि छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका करुन आपला जाज्वल्य इतिहास, खरा इतिहास पोहोचवणाऱ्या माझ्या सारख्याच्या बाबतीत मुख्यमंत्री शिंदे यांचे पूर्वाश्रमीचे सहकारी आणि आता ज्यांनी पक्ष बदलला ते सातत्याने अशी टीका टिप्पणी करतात.

त्यामुळे मुखमंत्री शिंदे यांचे मनापासून आभार व्यक्त केले.



आता त्यांनी हे जे समन्वयाची महत्वाची बाब आहे. ती त्यांच्या ही निदर्शनास आणून द्यावी. अभिनेता गोविंदा एकदा खासदार होते. तेव्हाचा त्यांची कामगिरी बघावी. आणि मला थोडीशी पातळी सोडून नाटक्या अशा शब्दात जर कोणी हिणवत असेल त्यांनी २०१९ ते २०१४ यामधला माझी संसदेतील कामगिरी तपासून पाहावी.

पहिल्याच वेळी तब्बल तीन वेळा संसदरत्न पुरस्कार मिळाल्यानंतर शिरूर मतदार संघाचे अनेक प्रश्न हे मार्गी लावल्यानंतर कोण अशा पद्धतीने टीका करत असेल तर त्यातून ज्याची त्याची संस्कृती दिसते. यापलीकडे काय बोलणार असे म्हणत डॉ. कोल्हे यांनी नाव न घेता राष्ट्रवादीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव-पाटील यांच्यावर टीकास्त्र सोडले.

बॉलिवूडचे अभिनेते गोविंदांना लोकसभेसाठी संधी दिली, त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आभार मानतो. पण छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल इतिहास मांडणाऱ्या मराठी कलाकाराला का हिणवले जाते? असा सवाल शिरूर लोकसभेतील मविआ उमेदवार अमोल कोल्हेंनी विचारला आहे. मुख्यमंत्र्यांचे पूर्वाश्रमीचे सहकारी म्हणून शिवाजी आढळरावांना कोल्हेनी यानिमित्ताने डिवचले. लोकसभा मतदार संघातल्या मायबाप जनतेनं माझ्या सारख्या सर्वसामान्य कुटुंबातील अभिनय क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तीला लोकसभेत निवडून दिलं. तसेच गोविंदाच्या खासदारकीचा लेखाजोखा एकदा पहावा,

### यातून संस्कृती दिसते!

पहिल्याच टर्म मध्ये तब्बल तीन वेळा संसदरत्न पुरस्कार मिळाल्यानंतर शिरूर मतदार संघाचे अनेक प्रश्न हे मार्गी लावल्यानंतर, हिरहिरीने मांडल्यानंतर कोण अशा पद्धतीने टीका करत असेल तर त्यातून ज्याची त्याची संस्कृती दिसते, असंही ते म्हणाले.

---

# आचारसंहितेमुळे रिंगरोडच्या भूसंपादनाला ब्रेक

## राज्य रस्ते महामंडळे 172 किलोमीटर लांब रिंगरोड हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभेची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पात राज्याचे वित्तमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी रिंगरोडच्या भूसंपादनासाठी तब्बल दहा हजार ५१९ कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे संमतीपत्र दिलेल्या गावातील शेतकऱ्यांचे निवाडे, नोटीस दिलेल्या शेतकऱ्यांकडून संमतीपत्र आणि मुदत संपल्यानंतर सक्तीने भूसंपादन आदी प्रक्रियेला आचारसंहितेपूर्वी वेग आला होता. मात्र, निवडणुकीच्या कामांमुळे वेळ लागणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सुचीत करण्यात आले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळाने (एमएसआरडीसी) १७२ किलोमीटर लांब आणि ११० मीटर रुंदीचा रिंगरोड हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे.दोन टप्प्यात हा प्रकल्प राबविण्यात येत असून पहिल्या टप्प्यात पश्चिम मार्गावरील भोरमधील पाच, हवेलीतील ११, मुळशीतील १५ आणि मावळातील सहा गावांचा समावेश असून एकूण ६५० हेक्टर जागेचे भूसंपादन करण्याचे नियोजित आहे. त्यानुसार ३४ पैकी ३१ गावांमधील ६४४ हेक्टर जमिनीचे भूसंपादन पूर्ण झाले आहे. त्यासाठी २९७५ कोटींचा निधी देखील वितरीत करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ या चार लोकसभा मतदारसंघांसाठी दोन टप्प्यात मतदान होणार आहे. त्यामुळे सर्व महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या



### "पीएमआरडीए' प्रकल्पाचा "आर्थिक सुसाह्यता' अहवाल

केंद्र सरकारच्या दळणवळण मंत्रालयाकडे अंतिम मान्यतेसाठी प्रलंबित आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी दळणवळण मंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच दिल्लीत बैठक झाली. पहिल्या टप्प्यातील रिंगरोड हा 32 किलोमीटर लांबीचा आहे. नगर, सोलापूर , सातारा रस्त्यांना जोडणार हा टप्पा असणार आहे. यासाठी नगर रचना योजनेच्या माध्यमातून भूसंपादन करण्याचा निर्णय "पीएमआरडीए'ने घेतला आहे. रस्त्याच्या कामासाठी किमान दोन हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा खर्च राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण देणार आहे. त्यासाठी "पीएमआरडीए'ने प्रकल्पाचा "आर्थिक सुसाह्यता' अहवालही तयार करून घेतला .आहे.

कामकाजातील जबाबदारी देण्यात आली आहे. तालुका पातळीवर तहसीलदार, उपविभागीय अधिकारी निवडणूक कामांमध्ये व्यस्त आहेत.

६ जूनपर्यंत आचारसंहिता लागू असल्याने या अधिकाऱ्यांना प्रशासकीय दृष्टीकोनातून केवळ निवडणुकीच्याच कामांवर लक्ष केंद्रीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आचारसंहिता लागू झाल्यानंतर महसूल विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणूक विषयक कामे देण्यात आली आहेत. परिणामी रिंगरोडचे भूसंपादन खोळंबले आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रिया पूर्ववत होण्यासाठी आचारसंहिता संपण्याची वाट पाहावी लागणार आहे.

# पुणे लोकसभेची निवडणूक चुरशीची होणार

## वसंत मोरे लढण्यासाठी इच्छूक : तिरंगी लढत होण्याची शक्यता




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा निवडणुकीची चूरस आता आणखी वाढणार आहे. कारण वसंत मोरे या मतदारसंघातून लढण्यासाठी इच्छूक आहेत. आपण शंभर टक्के निवडून येणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे येथे तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे..

पुण्यात लोकसभेच्या उमेदवारीसाठी अनेक जण उत्सूक आहेत. या दरम्यान वसंत मोरे यांनी वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली आहे. त्यामुळे आता पुणे लोकसभेतून वसंत मोरे वंचितकडून लढणार अशी शक्यता आहे. आंबेडकरांसोबत चर्चा सकारात्मक झाल्याचं वसंत मोरे म्हणाले आहेत आणि आंबेडकरांनीही 2 एप्रिलपर्यंत जाहीर करणार असल्याचं म्हटलं आहे. पुणे लोकसभेत महायुतीकडून मुरलीधर मोहोळ भाजपचे उमेदवार आहेत. तर महाविकास आघाडीकडून रवींद्र धंगेकरांना काँग्रेसनं तिकीट दिलंय. आता वसंत मोरे यांनीही उडी घेतली असून वंचितचं तिकीट मिळवण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत.

### जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडे लक्ष

प्रकाश आंबेडकरांनी पहिली यादी जाहीर करुन स्वतंत्र लढण्याचे संकेत दिलेलेच आहेत. त्यांची महाविकास आघाडीसोबत चर्चा थांबली आहे. त्यातच आता जरांगे पाटलांसोबत नवं समीकरण तयार करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. 30 मार्चपर्यंत जरांगेंनी वेळ मागितला आहे. त्यामुळं पुढच्या 2 दिवसांत नवं समीकरण समोर येईल असं आंबेडकर म्हणत आहेत.

प्रकाश आंबेडकर आणि संजय राऊतांमध्ये शाब्दिक चकमकही सुरु झाली आहे. राऊत महाविकास आघाडीत बिघाडी करत असल्याचा थेट आरोप आंबेडकरांनी केला आहे. इकडे रामदास आठवले यांनी प्रकाश आंबेडकरांच्या स्वतंत्र भूमिकेचं स्वागच करत दलित मतं भाजपलाच मिळणार असल्याचं म्हटलं आहे. आंबेडकरांनी स्वतंत्र लढावं पण दलित मतं माझ्यामुळं भाजपला मिळतील असे रामदास आठवले यांनी म्हटले आहे. दिवसांतच सर्वांसमोर मांडू. काही चर्चा आताच जाहीर करू शकत नाही.”

### शिरूर लोकसभा निवडणुक लढत होणार चुरशीची

आढळराव हे शिवसेनेत असून त्यांना महायुतीच्या माध्यमातून राष्ट्रवादीतून उमेदवारी मिळली आहे. शिरूर तालुक्यात यामुळे राजकीय समीकरणे बदलणार आहेत. आढळरावांसोबत भाजप व शिवसेना असेल, उलट डॉ. अमोल कोल्हे हे महाविकास आघाडीकडून असून, त्यांच्यासोबत आमदार अशोक पवार, शिवसेना (उबाठा) व काँग्रेस हे पक्ष असतील. अमोल कोल्हे हे मतदारसंघात, तसेच शिरूर तालुक्यात फिरकलेच नाहीत, असा आरोप त्यांचे विरोधक करत असले तरी त्याला जोरदार उत्तर कोल्हे यांनी दिले आहे. आजच्या परिस्थितीत दोघांमध्ये जबरदस्त चुरस असून, ही निवडणूक अटीतटीची होणार आहे हे नक्की. आता सुरुवात झाली असून प्रत्यक्षात निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतरच चित्र स्पष्ट होईल.

### पुण्यात नवी समीकरणं..

» लोकसभा निवडणुकीच्या आधी पुणे लोकसभा मतदारसंघात नवी समीकरणं जुळू लागले आहेत. त्यामुळे पुण्यात कांटे की टक्कर पाहायला मिळू शकते. लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी वसंत मोरे यांनी मनसेचा राजीनामा दिला. त्यांना महाविकासआघाडीकडून उमेदवारी मिळेल अशी चर्चा असतानाच काँग्रेसने येथून रविंद्र धंगेकरांचं नाव जाहीर करुन टाकलं. त्यामुळे वसंत मोरे यांना वंचितचा आता आसरा घ्यावा लागला आहे.वसंत मोरे यांची भेट घेतल्यानंतर प्रकाश आंबेडकर म्हणाले, ‘वसंत मोरे यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा झाली. अधिकृत निर्णय ३१ मार्च पर्यंत जाहीर करू. महाराष्ट्रात नव्या राजकारणाची सुरुवात कशी होईल यासाठी मी आताच चर्चा जाहीर करत नाही.’

# पुणे महापालिका तिजोरीत भर

## विविध विभागांकडून महसूलवाढीवर भर



**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या विविध विभागांकडून महसूलवाढीवर भर देण्यात येतो. त्यानुसार या वर्षीही काही विभागांनी उद्दिष्ट पूर्ण केले, तर काही उद्दिष्टाजवळ पोहोचले आहेत. ३१ मार्चपर्यंत ऑनलाइनच्या माध्यमातून नागरिकांकडून कर भरला जातो. त्यामुळे संबंधित विभागांच्या महसूलात काही प्रमाणात वाढ होणार आहे. OOL २०२३ -२४ वर्षाच्या अर्थसंकल्पात मिळकतकरापोटी २ हजार ४०० कोटी रुपये इतके उत्पन्न मिळेल, असे उद्दिष्ट ठेवले होते.

मिळकतकर, बांधकाम शुल्क, पाणीपट्टी आणि केंद्र व राज्य सरकारकडून मिळणारा वस्तू व सेवा कर (जीएसटी) अशा विविध प्रकारच्या कर व शुल्कापोटी २०२३-२४ या आर्थिक वर्षात महापालिकेच्या तिजोरीत तब्बल ७ हजार ४६३ कोटी रुपये जमा झाले आहेत. आर्थिक वर्ष संपण्यास आणखी दोन दिवसांचा अवधी शिल्लक आहे. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात आणखी भर पडण्याची शक्यता आहे त्यानुसार, २८ मार्चपर्यंत मिळकतकर, बांधकाम शुल्क, पाणीपट्टी, जीएसटी अशा विविध करांपोटी ७ हजार ४६३ कोटी रुपये महापालिकेच्या तिजोरीत जमा झाले आहेत.

# मतदानाच्या कामांसाठी दळणवळण आराखडा

## सुरक्षाव्यवस्था आणि आपत्तीच्या दृष्टीने विविध पैलूंचा समावेश

**पुणे | प्रतिनिधी**

निवडणूक प्रक्रियेसाठी सविस्तर दळणवळण आराखडा तयार करून मतदान, सुरक्षाव्यवस्था आणि आपत्तीच्या दृष्टीने विविध पैलूंचा समावेश दळणवळण आराखड्यात करावा. जेणेकरून प्रत्येक काम वेगाने पूर्ण होईल. ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांच्या मतदानासाठीच्या व्यवस्थेचाही या आराखड्यात विचार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केल्य.



जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी निवडणूक समन्वय अधिकाऱ्यांच्या बैठकीत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेतला, त्या वेळी डॉ. दिवसे बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित निवडणूक आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस बारामती निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी, मावळ निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर आदी उपस्थित होते. मतदानासाठी नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना संपूर्ण प्रक्रियेची माहिती व्हावी यासाठी सविस्तर प्रशिक्षण सत्र आयोजित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिले आहेत. कर्मचाऱ्यांना ईव्हीएमच्या प्रात्यक्षिकासह नियमांची माहिती प्रशिक्षणाद्वारे देण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेची नियमावली, घ्यावयाची खबरदारी, ईव्हीएम हाताळण्याची पद्धत याविषयी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

डॉ. दिवसे म्हणाले, निवडणूक प्रक्रियेसाठी दळणवळण आराखडा सूक्ष्मरीतीने तयार करून त्यात विविध जबाबदाऱ्या पार पाडताना प्रभावी संवादासाठी आवश्यक प्रक्रिया निश्चित करावी. प्रत्येक लोकसभा मतदारसंघात मतदानासाठी पुरेसे मनुष्यबळ देण्यात आले आहे, त्यांचे प्रशिक्षण योग्यरीतीने करण्यात यावे. मतदार यादीशी संबंधित कामे वेळेवर करण्यात यावी. नियंत्रण कक्षाकडे येणाऱ्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी. असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे दिले.

### विविध विषयांचाआढावा...

» प्रत्येक लोकसभा मतदारसंघात मतदानासाठी पुरेसे मनुष्यबळ देण्यात आले आहेत. त्यांचे प्रशिक्षण योग्यरितीने करण्यात यावे. मतदार यादीशी संबंधित कामे वेळेवर करण्यात यावी. नियंत्रण कक्षाकडे येणाऱ्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी.मतमोजणी केंद्राचा आराखडा, सुरक्षा व्यवस्था, ज्येष्ठ नागरिकांचे मतदान, मतदान साहित्य वितरण, मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मतदान केंद्रातील सुविधा, टपाली मतदान, सी-व्हिजील ॲपवरील तक्रारी, निवडणूक प्रचारासाठी विविध परवानग्या, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी आदी विविध विषयांचा यावेळी आढावा घेण्यात आला.